17-04-2025-Dai-04_DH_PAN_20_08_2016-3.qxp 04/16/2025 10:16 PM Page 1



## निवडक


### शांतादुर्गा चामुंडेश्वरी महामाया देवस्थानात २१ रोजी भजनसंध्या

■ टीम दैनिक हेराल्ड



**साखळी, दि. १६** : श्री शांतादुर्गा चामुंडेश्वरी महामाया देवस्थान कुडतरीच्या ३१ व्या वर्धापन दिनानिमित्त सोमवार दि. २१ रोजी संध्याकाळी ७ वाजता कला साधना कुडतरी गोवतर्फे गोव्यातील नामवंत कलाकारांचा 'भजनसंध्या' हा भजनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.

यात गणेश पार्सेकर, पांडुरंग राऊळ व विठ्ठल शिरोडकर हे गायक कलाकार गायन करणार असून त्यांना संवादिनीवर राया कोरगावकर, तबल्यावर पुष्पशील मळीक व पखवाजवर ओमप्रकाश गावस संगीतसाथ करणार आहेत.



सौम्या नाईक



दीपिका खुटकर



वंशिका गावडे

### मोले येथील अभिनव विद्यामंदिर शाळेचा ९७.७७ टक्के निकाल

■ टीम दैनिक हेराल्ड

**मोले, दि. १६** : गोवा माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षक मंडळाने घेतलेल्या दहावीच्या परीक्षेत अभिनव विद्यामंदिराच्या मुलांनी घवघवीत यश संपादन केले . एकूण ३१ विद्यार्थी परिक्षेला बसले होते.

यात सौम्या नाईक हिने ९४.१६ टक्के गूण मिळवून विद्यालयात प्रथम क्रमांक पटकावला तसेच दीपिका खुटकर हिने ९२.८३ टक्के गुण व वंशिका गावडे हिने ८७.३३% गुण मिळवून दूसरा व तिसरा क्रमांक पटकावला. विशेष श्रेणीत ८ प्रथम श्रेणीत ११ व द्वितिय श्रेणीत ११ असे विद्यार्थी पास झाले .अभिमानाची गोष्ट म्हणजे सौम्या नाईक हिने धारबांदोडा तालुक्यात प्रथम स्थान प्राप्त केले . यावेळी मुख्याध्यापिका माधवी वेरेकर यांनी शिक्षक व पालकाच्या सहकार्याने विद्यार्थ्यांनी यश प्राप्त केले असे सांगितले . तसेच कोणत्याही अतिरिक्त शिकवण्या (ट्युशन) न घेता मुलांनी हे यश प्राप्त केल्याचे सांगितले. या त्यांच्या यशाबद्दल मुख्याध्यापिका, शाळेचे व्यवस्थापन, पालक शिक्षक संघ, शिक्षक व पालकांनी मुलांचे खूप कौतुक केले व भविष्यात असा चांगला निकाल आणणार असे सांगितले.

### सांखळीत १९ रोजी 'कीर्तनातून हरिभक्ती' विषयावर परिसंवाद

■ टीम दैनिक हेराल्ड

**साखळी, दि. १६** : गोमंतक संत मंडळ संचालित कीर्तन विद्यालय फोंडा आणि सम्राट क्लब सांखळी आयोजित कीर्तन प्रशिक्षण शिबिर शिवस्मृती खेडेकर हॉल येथे शुक्रवार दि. १८ ते २० एप्रिलपर्यंत होणार आहे.

यात शनिवार दि. १९ रोजी संध्याकाळी ४ वाजता 'कीर्तनातून हरिभक्ती' या विषयावर परिसंवाद होणार असून यात संत साहित्याचे अभ्यासक आनंद मयेकर, मयुरेश वाटवे, साहित्यिका दीपा मिरिंगकर, सरकारी महाविद्यालय सांखळीच्या मराठी विभाग प्रमुख डॉ. स्नेहा सुहास प्रभू महांबरे, कीर्तनकार दत्तगुरु अभ्यंकर विचार व्यक्त करणार आहेत. कीर्तन शिबिराचे संचालक कीर्तनकार सुहास वझे यांच्या मार्गदर्शनाखाली हे ३५ वे निवासी कीर्तन शिबीर आहे. या कार्यक्रमाला सर्वांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन कीर्तन शिबीर संचालिका शुभदा सावईकर यांनी केले आहे.

### ओम कला सांस्कृतिक केंद्र हळर्णतर्फे शिष्यवृत्ती योजना

■ टीम दैनिक हेराल्ड


**साळ, दि. १६** : हळर्ण येथील ओम कला सांस्कृतिक केंद्रातर्फे हळर्ण पंचायत क्षेत्रातील विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती योजना देण्याचे ठरविले आहे. ज्या कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न तीन लाखांपेक्षा कमी असलेल्या विद्यार्थ्यांसाठी या योजनेचा लाभ घेता येणार आहे. दहावी, बारावी व पदवीधर परीक्षेत ६५ टक्क्यांपेक्षा जास्त गुण प्राप्त केलेले विद्यार्थी या शिष्यवृत्ती योजनेसाठी पात्र असतील तसेच विद्यार्थ्यांनी आधारकार्ड किंवा मतदान ओळखपत्र सादर केल्यानंतरच शिष्यवृत्ती फॉर्म दिले जातील. फॉर्म आणि एकंदर तपशीलासाठी हळर्ण ग्रामपंचायतीचे माजी सरपंच व विद्यमान पंच ॲड. महेश्वर (मयूर) आनंद परब (९८२३०११९४५) यांच्याशी संपर्क साधावा, असे ओम कला सांस्कृतिक केंद्र – हळर्णतर्फे प्रसिद्ध करण्यात आले आहे.

# '२०२८ ऑलिम्पिक' पोमोना फेअरग्राउंड्सवर क्रिकेट सामने

## १२८ वर्षांनी वापसी | पहिल्यांदा १९०० च्या ऑलिम्पिकमध्ये खेळले

**मुंबई, दि. १६ :**

२०२८ मध्ये लॉस एंजेलिस येथे होणाऱ्या ऑलिम्पिक स्पर्धेत दक्षिण कॅलिफोर्नियातील पोमोना फेअरग्राउंड्स येथे क्रिकेट खेळले जाईल. यासाठी येथे तात्पुरते क्रिकेट स्टेडियम उभारले जाईल. आयोजन समितीने मंगळवारी याची घोषणा केली. पोमोनाच्या जत्रेच्या मैदानाला फेअरप्लेक्स म्हणून ओळखले जाते. ते लॉस एंजेलिसच्या पूर्वेस अंदाजे ५० किमी अंतरावर आहे. हे ५०० एकरचे इव्हेंट कॉम्प्लेक्स आहे जे १९२२ पासून लॉस एंजेलिस काउंटी फेअरचे आयोजन करत आहे. हे ठिकाण संगीत मैफिली, व्यापार शो, क्रीडा आणि सांस्कृतिक कार्यक्रमांसाठी ओळखले जाते. येथे वर्षभर कार्यक्रम आयोजित केले जातात.





गेल्या वर्षी अमेरिका आणि वेस्ट इंडिजमध्ये झालेल्या टी–२० विश्वचषकादरम्यान भारत–पाकिस्तान सामना न्यूयॉर्कमध्ये खेळवण्यात आला होता. यासाठी एक पॉप–अप स्टेडियम बांधण्यात आले. याशिवाय, लॉडरहिलमधील सेंट्रल ब्रोवर्ड स्टेडियम आणि टेक्सासमधील ग्रँड प्रेरी स्टेडियममध्येही विश्वचषक सामने खेळवण्यात आले.

२०२८ च्या ऑलिंपिक स्पर्धेत पुरुष आणि महिला क्रिकेटच्या दोन्ही प्रकारांमध्ये एकूण ६ संघ सहभागी होतील. आंतरराष्ट्रीयऑलिंपिक समितीने आधीच याची घोषणा केली आहे. दोन्ही श्रेणीतील सर्व सहा संघ त्यांच्या संबंधित संघात १५ सदस्यांची निवड करू शकतात. गेल्या वर्षी ऑलिंपिकमध्ये क्रिकेटचा समावेश करण्यात आला. यामध्ये क्रिकेटचा टी–२० फॉरमॅट निवडण्यात आला आहे.

ऑलिम्पिकमध्ये क्रिकेटचा समावेश फक्त एकदाच झाला होता. १२८ वर्षांनंतर क्रिकेट ऑलिम्पिकमध्ये परतणार आहे. यापूर्वी १९०० च्या पॅरिस ऑलिम्पिकमध्ये क्रिकेटचा समावेश करण्यात आला होता. तेव्हा ग्रेट ब्रिटन आणि फ्रान्सच्या संघांनी त्यात भाग घेतला. ग्रेट ब्रिटनने सुवर्णपदक जिंकले आणि फ्रान्सने रौप्यपदक जिंकले. दोन्ही संघांमध्ये फक्त एकच सामना खेळला गेला आणि हा सामना अंतिम म्हणून घोषित करण्यात आला.

२०२८ च्या ऑलिंपिकसाठी पात्रता प्रक्रियेबद्दल अद्याप कोणतीही माहिती देण्यात आलेली नाही. यजमान कोट्याचा फायदा त्यांना मिळणार असल्याने अमेरिका लॉस एंजेलिस ऑलिम्पिक मध्ये खेळेल हे निश्चित मानले जाते. याचा अर्थ असा की अमेरिकेव्यतिरिक्त, आणखी पाच संघ सहभागी होऊ शकतील आणि त्यांना पात्रता प्रक्रियेतून जावे लागेल.

१९९८ आणि २०२२ मध्ये दोनदा राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेत क्रिकेटचा समावेश करण्यात आला आहे. २०१०, २०१४ आणि २०२३ मध्ये तीनदा आशियाई क्रीडा स्पर्धेत क्रिकेटला स्थान मिळाले. २०२३ च्या आशियाई क्रीडा स्पर्धेत भारताने पुरुष आणि महिला दोन्ही गटात आपले संघ पाठवले आणि भारताने दोन्हीमध्ये सुवर्णपदके जिंकली.

२०२८ च्या ऑलिम्पिकमध्ये एकूण ३५१ पदक स्पर्धा होतील, जे २०२४ च्या पॅरिसमधील ३२९ स्पर्धांपेक्षा २२ अधिक आहेत. एकूण खेळाडूंची संख्या १०,५०० पर्यंत मर्यादित करण्यात आली आहे. यामध्ये ५,३३३ महिला आणि ५,१६७ पुरुष खेळाडूंचा समावेश आहे.

# राहुल भारताचा सर्वोत्तम यष्टीरक्षक

**मुंबई, दि. १६ :**



दक्षिण आफ्रिकेचा माजी यष्टीरक्षक मार्क बाउचर म्हणाला की, केएल राहुल हा भारताचा सर्वोत्तम यष्टीरक्षक आहे. भविष्यात तो भारतासाठी बहुतेक सामने खेळताना दिसेल. आयपीएलमधील तरुण खेळाडूंबद्दल बाउचर म्हणाला– प्रियांश आर्य आणि दिग्वेश राठी यांनी मला खूप प्रभावित केले आहे.

मंगळवारी जिओस्टार तज्ज्ञ बाउचर यांनी माध्यमांशी बोलताना सांगितले की, स्पर्धेत पुढे जाण्यासाठी आरसीबीला घरच्या मैदानावरही विजय मिळवावा लागेल. संघ बाहेर चांगली कामगिरी करत आहे, त्यांना घरच्या मैदानावरही विजयी फॉर्म आणावा लागेल.

बाउचर म्हणाले, आयपीएलच्या प्रत्येक हंगामात काही तरुण खेळाडू कामगिरी करतात. पंजाब किंग्जच्या प्रियांशने शानदार शतक झळकावले, त्याच्यासमोर विकेट पडत राहिल्या, पण त्याने शानदार फलंदाजी केली आणि शतक झळकावले. लखनऊ येथील दिग्वेश राठी यांनीही प्रभावित केले आहे, त्यांनी रवी बिश्नोईलाही मागे टाकले आहे. प्रियांशची तंत्रे खूप चांगली आहेत, तो फ्रंटफूटवर खूप खेळतो. जर त्याला शॉर्ट बॉलवर थोडीशी परीक्षा दिली गेली, तर त्याला अडचणी येऊ शकतात असे मला वाटते.

बाउचर म्हणाले की, त्यांची टीम स्पिरिट खूप चांगली आहे. जेव्हा तुम्ही बाहेर जाता तेव्हा तुम्ही अनेक सांघिक क्रियाकलाप करता. याचा फायदा आरसीबीला मिळत आहे. या हंगामात यजमान संघांसाठी खेळपट्ट्यांनी मोठी भूमिका बजावली आहे. या हंगामात चिन्नास्वामी स्टेडियमची खेळपट्टी फलंदाजीसाठी अनुकूल नव्हती, मला वाटते की घरच्या मैदानावर त्यांच्या पराभवाचे हेच मुख्य कारण आहे. जर बंगळुरूला स्पर्धेत प्रगती करायची असेल तर त्यांना त्यांच्या घरच्या मैदानावर जिंकण्याची सवय लावावी लागेल.





**बोरी : वासंतिक ब्रह्मचर्याश्रमाच्या उद्‌घाटन सोहळ्यात मार्गदर्शन करताना आचार्य महेश कमलाकर. बाजूला अध्यक्ष दिलीप प्रभुदेसाई, मिलिंद देवारी व घनश्याम भट.**

### बोरीमध्ये ब्रह्मचर्याश्रम वर्गाचे उद्‌घाटन

■ टीम दैनिक हेराल्ड

**बोरी, दि. १६** : द्रविड ब्राह्मण संघाच्या बोरी शाखेतर्फे घेण्यात येणाऱ्या वासंतिक ब्रह्मचर्याश्रम वर्गाचा उद्‌घाटन सोहळा वे. मू.महेश कमलाकर गुरुजींच्या निवासस्थानी घरगुती स्वरूपात संपन्न झाला. प्रारंभी वे.मू. महेश कमलाकर गुरुजींनी वैदिक प्रार्थना म्हटली. द्र. ब्रा. संघाचे बोरी शाखेचे अध्यक्ष दिलीपकुमार प्रभुदेसाई यांनी सर्व उपस्थितांचे स्वागत व प्रास्ताविक केले. त्यानंतर आचार्यांच्या तसंच इतर मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने कार्यक्रमाचे विधिवत उद्‌घाटन झाले.

आद्य शंकराचार्यांच्या तसबिरीला पुष्पहार अर्पण करण्यात आला. आचार्य महेश गुरुजींनी आपल्या मौलिक विचारांनी मुलांना तसेच पालकांना खूप छान मार्गदर्शन केले. शर्मिला प्रभुदेसाई यांच्या आभार प्रदर्शनाने कार्यक्रमाची सांगता झाली.

यावेळी व्यासपीठावर आचार्य महेश कमलाकर, द्र. ब्रा. संघाच्या बोरी शाखेचे अध्यक्ष दिलीपकुमार प्रभुदेसाई, खजिनदार घन:श्याम भट,अखिल गोमंतक द्र. ब्रा. संघाच्या कार्यकारिणीचे सदस्य, मिलिंद देवारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन स्निग्धा देसाई यांनी केले. यंदाचा हा वर्ग अनिवासी असून दि. ११ में पर्यंत चालणार आहे, असे द्रा. ब्रा. संघातर्फे कळविले आहे.

# पं. दीनदयाळ विद्यामंदिरात जलतरण कार्यशाळेला उत्स्फूर्त प्रतिसाद

■ टीम दैनिक हेराल्ड

**डिचोली, दि. १६** : व्हाळशी येथील पंडित दीनदयाळ विद्यामंदिरातर्फे आयोजित जलतरण कार्यशाळेचे १० दिवसीय उन्हाळी शिबिर दि. १५ ते दि. २६ रोजी श्री केळबाय मंदिर मूळगाव येथे होत आहे. या शिबिरातील कार्यशाळेला मुलांनी मोठ्या संख्येने सहभाग घेऊन उत्स्फूर्त प्रतिसाद दर्शविला आहे. शिबिरात वयोगट ७ ते १२ वर्षाच्या विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला आहे. प्रशिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली येत्या दहा दिवसात प्रशिक्षणार्थींना विविध जलतरण कौशल्याचे प्रशिक्षण दिले जाणार आहे. दि. १५ एप्रिल रोजी या शिबिराचा उद्‌घटन सोहळा झाला.



**व्हाळशी : केळबाई मंदिर परिसरात तळी परिसरात कार्यशाळेत सहभागी विद्यार्थी तसेच मार्गदर्शन करताना मान्यवर.**

सदर कार्यक्रमाच्या उद्‌घटन प्रसंगी व्यासपीठावर प्रमुख पाहुणे म्हणून जलतरण कार्यशाळेचे प्रशिक्षक तुळशीदास मंगेशकर शाळेच्या शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष अरुण नाईक, तसेच पालक शिक्षक संघाचे अध्यक्ष देवीप्रसाद भट, श्री केळबाई मंदिराचे पुजारी वसंत गाड, शाळेच्या मुख्याध्यापिका सुप्रवी बालो, शिक्षक, शिक्षिकेत्तर कर्मचारी, प्रशिक्षणार्थी, पालक आदी उपस्थित होते. शाळेच्या मुख्याध्यापिका सुप्रवी बालो यांनी कार्यक्रमाला उपस्थित मान्यवरांचे स्वागत व ओळख करून दिली. मान्यवरांनी आपल्या मनोगतातून जलतरणाचे महत्व सांगून मुलांना पुढील उपक्रमासाठी शुभेच्छा दिल्या. यावेळी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रगती पळ यांनी केले.

# पंजाबने मोहन बागानला २–० ने हरवून मुलांचा किताब पटकावला

## झारखंडने ओडिशाला १-० ने पराभूत करून मुलींच्या गटात विजेतेपद

■ टीम दैनिक हेराल्ड

**मडगाव, दि. १६ :** विद्यमान विजेते पंजाब एफसी यांनी मंगळवारी रात्री राय पंचायत फुटबॉल मैदानावर फ्लडलाइट्सखाली मोहुन बागान सुपर जायंट (एमबीएसजी) संघाचा २–० असा पराभव करत पुन्हा एकदा विजेतेपद कायम राखले.





या अतिशय वेगवान सामन्यात, पंजाब एफसीने सुरुवातीपासून आघाडी घेतली. फक्त १० व्या मिनिटाला शुभम गुरूंगने पहिले गोल करत आघाडी दिली. दुसऱ्या सत्रात बचावपटू आशिष लोहार याने ६४ व्या मिनिटाला दुसरा गोल करत संघाचे विजेतेपद निश्चित केले.

आमचा संघ संपूर्ण स्पर्धेत पराभूत झाला नाही, यामुळे आमच्या दीर्घकालीन सराव व तयारीचे फळ मिळाले, असे पंजाब एफसीचे कर्णधार अनिकेत यादव याने विजयानंतर सांगितले.

संध्याकाळी झालेल्या मुलींच्या अंतिम सामन्यात झारखंडने ओडिशावर १–० अशी मात करत विजेतेपद मिळवले. अनामिका सांगा हिने २० व्या मिनिटाला एकमेव निर्णायक गोल करत झारखंडसाठी विजयाचे शिल्पकार ठरली. ओडिशाच्या सततच्या प्रयत्नांनंतरही झारखंडच्या कर्णधार चांदणी कुमारी हिच्या नेतृत्वाखालील बचावफळीने शेवटपर्यंत आघाडी कायम राखली.

विजेतेपद मिळवणे आमच्यासाठी अत्यंत महत्त्वाचे होते. आमची पुढे खेळण्याची रणनीती आमच्या एका गोलच्या आघाडीचे रक्षण करण्यात यशस्वी ठरली, असे झारखंड संघाच्या कर्णधार चांदणीने सांगितले.

भारताचे माजी फुटबॉल कर्णधार बाईचुंग भूटिया हे या अंतिम सामन्याचे प्रमुख पाहुणे होते. त्यांनी सांगितले, अशा स्पर्धा आपल्या देशातील युवकांसाठी अतिशय उपयुक्त आहेत. या स्पर्धा मुला–मुलींना स्पर्धात्मक व्यासपीठ देतात, जे त्यांच्या विकासासाठी आवश्यक आहे.

२०२४ मध्ये झालेल्या ड्रीम स्पोर्ट्स चॅम्पियनशिपच्या पहिल्या आवृत्तीतून १७ खेळाडूंनी भारतीय अंडर–१७ राष्ट्रीय शिबिरात प्रवेश मिळवला होता. यावरून या स्पर्धेचे महत्त्व भारतीय फुटबॉलसाठी किती आहे हे सिद्ध होते.

मंगळवारीच्या अंतिम सामन्याला अनेक मान्यवर उपस्थित होते – भारताचे माजी फुटबॉलपटू सुब्रत पॉल व बाईचुंग भूटिया, पर्यटन मंत्री रोहन खंवटे, परिवहन मंत्री माविन गोडिन्हो, मडगावचे आमदार दिगंबर कामत आणि गोवा फुटबॉल असोसिएशनचे अध्यक्ष कैतानो फर्नांडिस आदी मान्यवर यामध्ये सहभागी होते.



**साखळी : शिवस्मृती आर्ट गॅलरीला भेट दिलेल्या गुरुदास गावस हायस्कुलच्या विद्यार्थ्यांसोबत शिवानंद खेडेकर व प्रीती उसपकर.**

# गुरुदास गावस हायस्कुलच्या विद्यार्थ्यांची शिवस्मृती आर्ट गॅलरीला भेट

■ टीम दैनिक हेराल्ड

**साखळी, दि. १६** : राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाचा भाग म्हणून गोकुळवाडी सांखळी येथील गुरुदास गावस मेमोरियल हायस्कुलच्या इयत्ता ९ वीच्या विद्यार्थ्यांनी अनेक पुरस्कारांनी सन्मानित ज्येष्ठ चित्रकार व सामाजिक कार्यकर्ते शिवानंद खेडेकर यांच्या 'शिवस्मृती खेडेकर आर्ट गॅलरी' ला भेट देऊन श्री.खेडेकर यांच्याकडून बरीच माहिती जाणून घेतली.सोबत विद्यालयाच्या चित्रकला शिक्षिका प्रीती उसपकर होत्या. या अभ्यास दौऱ्यात २० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

यावेळी विद्यार्थ्यांनी श्री. खेडेकर यांना अनेक प्रश्न विचारून आपल्या शंकांचे निरसन करून घेतले.यावेळी श्री. खेडेकर यांनी त्यांनी काढलेली काही चित्रे विद्यार्थ्यांना दाखवून त्या चित्रांसंदर्भात माहिती दिली. चित्राचे विषय कसे सुचतात,कल्पना कश्या सुचतात यासारख्या विविध विषयांवर त्यांनी मार्गदर्शन केले. ते म्हणाले, निसर्ग हा गुरू आहे. चित्रकला ही श्रेष्ठ कला आहे. चित्रकलेत एकटाच सहभागी होऊन आपली कला सादर करत असतो. इतर कला या सोबतच्या कलाकारावर अवलंबून असतात. कोणत्याची कलेची पदवी घेतली म्हणून होत नाही तर त्याचा रियाज महत्वाचा असतो. तसेच कलाकार म्हणून त्याला समाजाने मान्यता देण्याची गरज असते. या शैक्षणिक दौऱ्यासाठी संस्थेचे अध्यक्ष प्रताप गावस, व्यवस्थापक गीता गावस, मुख्याध्यापिका लक्ष्मी सिनारी, सचिव हनीफ शेख, सदस्य सुरेश गावस, पालक शिक्षक संघाचे अध्यक्ष गणेश मळीक व सदस्य अर्जुन मळीक यांचे मार्गदर्शन व सहकार्य लाभले.

RNI No. GOAMAR/2013/49899 **दैनिक हेराल्ड** वर्ष १३, अंक २२४ **मालक:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., **प्रिंटर:** श्री. वॉल्टर लिगोरिओ डिसोझा, **प्रकाशक:** श्री. वॉल्टर लिगोरिओ डिसोझा, **प्रकाशन स्थळ:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., प्लॉट क्र. एल – १३५, फेज २, वेर्णा औद्योगिक वसाहत, वेर्णा, सालसेत, गोवा, **छपाई स्थळ:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., प्लॉट क्र. एल – १३५, फेज २, वेर्णा औद्योगिक वसाहत, वेर्णा, सालसेत, गोवा. **एडिटर इन चीफ:** श्री. आर. एफ. फर्नांडिस, **संपादक:** श्री. दिनेश वासुदेव केळुस्कर (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी).

RNI No. GOAMAR/2013/49899 **Dainik Herald** Volume 13, Issue 224 **Owner:** Herald Publications Pvt. Ltd., **Printer:** Mr. Walter Ligorio D'Sousa, **Publisher:** Mr. Walter Ligorio D'Sousa,, **Published from:** Herald Publications Pvt. Ltd., Plot No. L - 135, Phase II, Verna Industrial Estate, Verna, Salcete, Goa and **Printed from**: Herald Publications Pvt. Ltd., Plot No. L - 135, Phase II, Verna Industrial Estate, Verna, Salcete, Goa. **Editor in Chief** Mr. R. F. Fernandes, **Editor :** Mr. Dinesh Vasudev Keluskar (Responsible under P.R.B. Act), .